
# डॉ. नितीन मोरे



# एका नाटकाची गोष्ट!

## (नाटिका)

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# एका नाटकाची गोष्ट!

लेखक:- **डॉ. नितीन मोरे,**

श्वसनरोग तज्ञ

वसई, जि, पालघर.

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

**This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.**

**हे नाटक पूर्णपणे काल्पनिक आहे. याचे कोणा वास्तवाशी साम्य आढळून आल्यास तो निव्वळ योगायोग समजावा. करमणूक एवढाच याचा उद्देश आहे.**

प्रकाशक- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237 (फ्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)

प्रकाशन :- २५ डिसेंबर २०२३ (नाताळ)

©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत. त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली. सामान्यत:- आजूबाजूच्या दैनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे सेहचाळीसावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**

**Email -** drnmore@yahoo.com

# एका नाटकाची गोष्ट!

## डॉ. नितीन मोरे



१

(स्टेजवर पाठीमागे डोंगरदऱ्या. विस्तीर्ण मैदान. सुकलेले गवत. दूरवर नदी असल्याचा भास.

एक हडकुळा, हिरव्या पठाणकोटातला डाकूसारखा दिसणारा **डाकू रब्बर सिंग**. हाडाचा सापळा पण हावभाव एखाद्या खूंखार डाकूसारखे. ताडताड पावले टाकत येतो.)

मी! डाकू रब्बर सिंग.

खूंखार डाकू रब्बर!

दूरदूर पर्यंत पोरं दूध पीत नसतील तर आया धमकवायच्या.. दूध पी नाहीतर रब्बर येईल. बाया नवऱ्याला सांगायच्या, रात्रीच नव्हे तर दिवसाही जंगलातून जाऊ नका, नाहीतर रब्बर येईल. सगळयांच्या डोळयांत मला दिसायची ती डाकू रब्बर सिंगाची दहशत.

म्हणजे माझी.

दहशत! आज किती दिवसांनी या चंबळच्या खोऱ्यात आलोय तर ही चंबळ नदी पाहून उ-चंबळू-न आलंय.

काय दिवस होते!

ही बंदूक नुसती आता संदूकीत पडून असते.

पण तेव्हा.. गोळया ही होत्या. बंदुकीत!

मोठा भाऊ गब्बरसिंग.

तो सिनेमात गेला. म्हणजे तो तसा नट बिट नव्हता पण त्याला रोल मिळाला डाकूचाच! मग काय? अगदी जिवंत डाकू डोळ्यांसमोर. फक्त मागे भेटला तर म्हणाला, बाकी सगळं ठीक पण बंदुका नकली. माणसं खरी पण वागतात नकली. म्हणजे, मारामाऱ्या नकली. मजा नाही रे!

आणि तिकडे सिनेमा म्हणजे काय अगदी काल्पनिक! म्हणजे सत्याचा विजय वगैरे काल्पनिक काहीतरी दाखवतात तिकडे. म्हणून बिचाऱ्याने मारबिर खाल्ला सिनेमात. मग कानाला खडा अगदी. म्हणाला, परत म्हणून सिनेमात नको जायला. आपली पण काही इज्जत आहे की नाही?

पण माझी गोष्ट तशी वेगळी आहे. नाही म्हणजे नवीन सिनेमा नाटक वाले आपल्या गोष्टीला कशी 'हटके' आहे म्हणतात तसे तोंडदेखले नाही!

आणि तसं मी कशाला खोटं नि तिखट मीठ लावून सांगू? काही लोक कसे सरळसोट जगतात तसे नाही माझं.

डाकू म्हणा, लडाकू म्हणा.. डाकू रब्बर सिंग!

आता तुम्ही म्हणाल, मी इथे काय करतोय?

इथे म्हणजे या चंबळच्या तीरी!

ह्या डोंगर दऱ्यांत आयुष्य गेलं नि तरी हा प्रश्न? नाही म्हणजे डाकूगिरी सोडली त्याला काही वर्षे झाली. मग आज आठवण आली नि आलो इकडे!

मी डाकू. अशाच टगेपणा नि रावडीपणात कित्येक वर्षे गेली.

आणि आता?

आता तुम्ही म्हणाल, माझी भाषा अशी कशी? शुद्ध.

अगदी निवृत्त पुणेकरी कारकुनासारखी!

तर उत्तर सोपेय!

नाटकातल्या 'मी' ला नाटककार देणार ती भाषा! त्याने ठरवले, शुद्ध साजुक तुपातील भाषेत हा निवृत्त डाकू बोलणार तर माझे काय चालणार त्याच्या समोर? त्याच्या हातातला बाहुला मी!

कोणीतरी म्हणालेले ना, त्या उपरवाल्याच्या हातातल्या आपण साऱ्या कठपुतळ्या आहोत! त्याने बोटे हलवून आपल्याला जीवनात पुढे मागे नाचवावे!

तर त्या नाटककारास ही तोच उपरवाला नाचवत असणार! तो त्याला म्हणाला, लिही असं असं. बिचारा काय करणार? यातला पहिला तो म्हणजे उपरवाला नि दुसरा.. उघड आहे आमचे लेखक महाशय. तर त्यांचे काय? त्यांनी लिहिलं. नि मी काय करणार? बोलतोय! तर तसं समजून घ्या. म्हणजे मी तसा प्रत्यक्षात आहे. आहेच.

म्हणजे नाटकातला मी म्हणजे प्रत्यक्षातला मीच आहे!

गोंधळू नका.

मी प्रत्यक्ष डाकू रब्बर सिंग. नाटकातला खोटा खोटा, खरं वाटेलसा अभिनय करणारा नव्हे.

गंमत आहे ना?

मोठा भाऊ सिनेमात नि धाकटा नाटकात!

तर मी पण तसा खराखुरा डाकू. नाटकात असलो तरी खराखुरा. फक्त ही मध्यमवर्गीय भाषा तोंडी दिलीय.. ती बोलतोय!

गब्बरला नाही का खरी सोडून खोटी मारामारी करायला लागली होती? तशी ही खोटी भाषा. म्हणजे माझ्यासाठी! चालायचेच!

शेवटी नाटक म्हणजे काय?

खरीखुरी वाटावी अशी खोट्याची दुनिया. बोलूनचालून नाटकच ते!

आणि सगळीकडेच अगदी खरेच खरे व्हायला लागले तर ही असत्याधारित दुनिया चालावी कशी? खरंय की नाही?

सत्याचे गोडवे गायला आजूबाजूस असत्याला फिरावे लागते. सत्य हेच आहे की जगात सत्याची किंमत बाकी प्रचलित असत्यामुळेच आहे!

तर मी!

विषयांतर नको!

तर माझ्या ह्या सिंगल फसली अवताराकडे बघून फसू नका. गब्बर माझ्या चौपट आकाराचा. गाडाभर अन्न खाणारा. मी हा असा. हडकुळा! पण माझ्या हाडांकडे पाहून तुम्हाला मी असातसा नि साधासुधा वाटलो तर फसाल अगदी.

गब्बरहून माझी दहशत जास्त.

खोटं वाटेल पण खरंय ते.

अगदी मी रब्बरसिंग डाकू जितका खरा तितके खरंय ते.

मी असा हाडाचा डाकू. रबरासारखा लवचिक. म्हणजे अंगातला सारा चिक जाऊन चिपाडं उरलीत असं वाटण्यासारखा. डाकूनं कसं धिप्पाड असावं.. पण मी चिप्पाड!

पण वरवर बघू नका.

सारं काही माणसाच्या ह्या मेंदूत आहे बरं.

त्याने विचार केला तर एकच माणूस देव ही बनू शकतो नि दानव ही.

डाकूपणाच्या कारकीर्दीत मी डाकूपणाला शोभेसाच होतो. अगदी क्रूर नि निर्दयी. उगाच नाही गावातले लोक चळाचळा कापायचे नुसत्या नावाने. पण गेली ती दहशत. गेले ते दिवस. काप गेले नि.. जाऊ दे हे अतिच होतेय जरा भेंडीसारखं बुळबुळीत. डाकूची जबान कशी तिखट धारदार तलवारीसारखी हवी. कोल्हापुरी ठेचा, तो ही जिभेवर बचकाभर ठेवल्यासारखा. पण आमच्या लेखकमहाशयांनी तुपात घोळलेली पुरणपोळी बनवलीय जणू, ती ही श्रीखंडाबरोबर. तिखटजाळ मटणाचा रस्सा ओरपणाऱ्याला हे सात्विक काही.. नाइलाज आहे माझा. उपवासाचे दिवस आलेत आणि काय!

एका डाकूला तलवारीने भेंड्या कापायला लावाव्यात? ज्या तलवारीने मुंड्या उडवल्या तिने भेंड्या उडवाव्यात?

पण झाले हे असे झाले.

ह्या नाटकाच्या निमित्ताने परत हे असे इथे यायला मिळाले हेच समाधान. त्या बद्दल ह्या नाटकी लेखकाचे.. नव्हे नाटक लेखकाचे आभारच मानायला

हवेत. डाकुंचे नाटकात काय काम? पण बोलावले मला. रिकामटेकडा मी! सर्वप्रथम पोहोचलो. बाकी येतील इतर. लेखक महाशयांच्या सुपीक डोक्यात काय पिकतंय कोणास ठाऊक पण ही सारी योजना त्याचीच. आता बाकी सारे येतील न येतील.

मला हे स्वागताचे स्वगत देऊ केलेय.. आनंद आहे!

(पाठून पावलांचा आवाज येतो. रब्बरसिंग चपापतो, सावध होत तिकडे बघतो)

मी निरोप घेतो.. लेखक महाशय येताहेत वाटतेय.. तेच असणार. माझ्या मागावर! पण मला सवय आहे. पोलिसांना गुंगारा दिलाय तर ह्या लेखकाची काय बात? सटकावे. निसटावे.. उगाच का लटकावे..

(तो जायला निघता निघता झोळी घेतलेल्या नाटकातल्या लेखकाचा प्रवेश होतो. रब्बरसिंग धावत बाहेर जातो. लेखक त्याच्या मागोमाग जातो.. रब्बरसिंग सापडत नाही.. **लेखक** परततो.)

हॅट.. निसटला वाटतं. तो रब्बरसिंगच होता ना? नाही म्हणजे तुम्हाला तसं म्हणाला ना तो? महा डांबीस.

डाकू म्हणे. लडाकू!

बडबड तर अशी की चंबळच्या खोऱ्यात जणू राज्यच करायचा. लक्ष नका देऊ त्याच्याकडे. बिलंदर भारी! कलंदर ही! नाही मला कसे ठाऊक विचारताय? माझाच तर .. काय म्हणू? पुत्र? मानसपुत्र? नव्हे खरंतर पात्र! होय, मानसपात्र! माझ्याच नाटकासाठी जमवलेल्या पात्रांपैकी एक तो. सगळी पात्रं जमवली नि हा बेटा हातावर तुरी देऊन निसटला. डाकूच तो! सवयच त्याची पळण्याची.

पण मला सांगा मी नसेन तर तो तरी असेल का? माझ्यावाचून त्याला काय अस्तित्व आहे? मी म्हणेन तसा वागेल तो. बोलेल मी म्हणेन तसा. पण बेट्याला हौस भारी. इकडे येऊन नाटकातल्या स्वगतासारखा बोलला असणार. काय तर म्हणे.. गब्बरचा भाऊ रब्बर. आणि ह्या हाडाच्या सापळ्याला सारे घाबरायचे वगैरे! बोलायला काय जाते?

मेलेली कोंबडी आगीला भीत नाही नि निवृत्त डाकू थापा मारायला कचरत नाही. पण असा हडकुळा नि निरूपयोगी डाकू का आणला मी? काय आहे मोठ्या नाटकाच्या प्लॉटचा भाग आहे तो. आणि तेवढाच उपयोग त्याचा! सगळ्या पात्रांची जमवाजमव केली, म्हटले जमवू नाटकाची भट्टी नि पाहिले तर हा गायब! बाकीच्यांना बसवून आलोय त्याच्या मागोमाग. तर इथूनही बेट्या गायब. आता तिकडची पात्रे गोंधळ न घालोत म्हणजे मिळवली! नाहीतर एकेक जण आपले रंग उधळायला लागले तर नाटकच उधळले जायचे. मला वाटतं मी जायला हवं. त्याआधी एकदा डोकावतो रब्बरसिंग सापडतो का. नाहीतर जमलेली पात्रमंडळी, त्यांची तरी खबरबात घेतो. तेवढी तर तेवढी. तेवढ्या पात्रांतही करेन नाटक.  पात्र म्हणजे.. नाटकात पात्र म्हणून येण्यास पात्र अशी खास मंडळी सगळी.

तुम्हाला सांगतो, सोपे नाही हे. चार सहा पात्रे गोळा करा. त्यांना बोलते करा.. त्यांची गोष्ट ऐकवा नि त्यांची एकमेकांशी सांगड घालून बनवा नवीन गोष्ट. लोकांचा विश्वास बसेल अशी खरी वाटेलशी खोटी गोष्ट!

पण खरं सांगू?

जगात सत्य म्हणून खरीखुरी गोष्ट आहे का अस्तित्वात?

डोळ्यांना दिसेल ते सत्य की मनाला पटेल ते सत्य?

की मनाला वाटेल ते सत्य?

कोणास ठाऊक!

कदाचित या साऱ्या सत्यांची भेळ, नाहीतर मिसळ असेल खरे सत्य!

पण मी तर म्हणतो जगात कथा, कादंबऱ्या, नाटके लिहिणारे तमाम लेखक म्हणजे मात्र जातिवंत खोटारडे. काहीतरी काल्पनिक लिहितात. सारेच कल्पनाविश्व! आभास नुसता! पण हातोटी अशी की लोकांना खरेच वाटावे. लोकंही काय?

खोट्यालाच खरं मानून टाळयाबिळया पिटतात! मग काय?

आमच्यासारख्या लेखकांचे वगैरे फावते चांगलेच. भटाला दिली ओसरी नि लेखक हातपाय पसरी. लिहितोय आपला कथा कादंबऱ्या. आणि नाटकं लिहिण्याची नाटकं देखील करतो!

पण म्हणूनच मी आहे बरं हे ही खरं!

(बाहेरून कसला तरी आवाज येतो. अगदी बारीकसा.)

तुम्हाला आवाज येतोय का कसला?

नाही?

मग माझी ती पात्रे माझ्याबरोबर फक्त संवाद साधत असणार. इतरांना कसले ऐकायला जातेय! माझीच मानसपात्रे ती!

तर मी चाललोय. जेवढी आहेत तेवढी तरी धरून ठेवायला. आजकाल तुम्हाला सांगतो या पात्रांचाही काही नेम नाही उरला. कुणी मध्येच रुसून काय बसतील. कोणाची वाचाच काय बसेल. कुणी विचित्रासारखे काय वागायला लागतील. कोणाचा भरवसा द्यावा? तरी बरे ह्यांच्या दोऱ्या माझ्या हाती आहेत.

तुम्हाला म्हणून सांगतो, एका पात्राने काय म्हणावे? म्हणे, तुम्ही खुशाल लेखक म्हणून मिरवा, पण लेखकाकडून लिहवून घेतो तो आकाशातला कुणी, तो कठपुतळीसारखा लेखकास खेळवतो म्हणे. माझ्याच पात्राने असे म्हणावे? मेरी बिल्ली मुझसे म्यांव? मेरा कौवा मुझपे काव? मेरा कुत्ता मुझपर भो भो? पण हे असे झालेय.. निघतो.

जरा सगळ्यांना लायनीत लावायला हवे.

संहिता म्हणे.. लवकर हवीय. हवीय तर देतो. जमवली पात्रं. घालून बैठक लिहू म्हटले नाटक तर हा रब्बरसिंग डाकू पळाला.

निघतो.. अजून कितीतरी पात्रांची व्यवस्था लावायची बाकी आहे..

(लेखक आधी डाकू गेला तिथे डोकावतो. मग परत दुसऱ्या द्वारातून निघून जातो.

हळूच **प्राध्यापक भोळे** आत शिरतात. जुन्या जमान्यातले. साधारण साठीतले. संस्पेंडरने वर पकडून धरलेली पँट नि डोक्यावर हॅट.)

नमस्कार!

गेले ना लेखक महोदय. लपून पाहात होतो. ते गेले नि मी आलो. तुम्ही ओळखत नसाल मला. नाही म्हणजे मी लेखक महोदयांच्या गोष्टीतले पात्र इतके ओळखले असणार तुम्ही. पण मी कोण? हा प्रश्न तुमच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसतोय मला.

कोहम.. कौन हम?

काय बरं माझं नाव?

(हॅट काढून डोकं खाजवतो.)

यस्स. आठवले.

नाही, मी नावाने आठवले नाही.

तर मला आठवले.

विसरायला मी काही विसरभोळा नाहीय!

नावाने प्राध्यापक विसरभोळे.. नो, नुसताच भोळे. भालचंद्र बाळकृष्ण भोळे. ट्रिपल बी! म्हणजे हे मला कॉलेजातली टारगट पोरांनी दिलेलं नाव.. असं लेखक महाशयांचे म्हणणे आहे!

तर मी, प्राध्यापक भोळे.

माझा विषय कुठला?

आठवला की सांगतो.

लेखकरावांनी असा हाताला पकडून आणला मला नाटकात.

नाटकाचं काय आहे ना, या लोकांना प्राध्यापक म्हटले की विसरभोळे असं समीकरणच बनवून टाकलंय यांनी. म्हणून कितीही तल्लख स्मरणशक्ती असली तरीही अभिनय मात्र विसरभोळेपणाचा.

अगदी जराही विसरभोळेपणाचा विसर पडू द्यायचा नाही!

बेअरिंग म्हणे भूमिकेचं!

पण तुम्हाला सांगतो, आम्हांला आमचा न आवाज आहे ना विचार. बोलावे काय नि कसे नि कुठे ते ठरवणार ते हेच लोक!

नि मी आठवावे काय नि विसरावे काय हे ही ठरवणार ते हेच लोक! आम्ही बापडे, ताबेदार नुसते हुकमाचे. लेखक म्हणतोय म्हणून काहीही करायला तयार! पण मगाशी चोरून ऐकलंय मी, लेखक महाशय म्हणालेले, आम्ही पात्र लोकं रूसून बसतो काय, वाचा बसते काय.. वगैरे वगैरे! चोराच्या उलट्या

बोंबा! दुसरं काय! कठपुतळीचा खेळ करणारे कधी बाहुल्यांना बोल लावत नाहीत!

पण हे सांगणार कोण?

लेखकरावांनी केलं काय, आम्हा पात्रांना जमवलं, मग लागले गोष्ट बनवायला. त्यात मी म्हणजे विनोदासाठी नि विनोदापुरता! फोडणी विनोदाची म्हणाना! बाकी पण होती काही पात्रं. पण आम्हांला बसवून हे साहेब पळाले एक कुठलं तरी पात्र हरवलं म्हणत. हातचे सोडून पळत्याच्या मागे!

म्हटलं कुठे गेले लेखकराव.. म्हणून मागोमाग आलो. तर हे आपले भाषण ठोकत उभे येथे. म्हटलं आपण ही थोडं बोलून घ्यावं. आता तुम्ही म्हणाल, हे शब्द माझे की नाटककाराने माझ्या तोंडी लिहिलेले? लॉजिकली काय वाटते?

हां.. लॉजिक! तर्कशास्त्र.

माझा विषय तर्कशास्त्र!

आठवला आता!

तर लॉजिकली बोलायचे तर माझा कर्ता करविता कोण? तर लेखक महोदय! तर मला स्वतंत्र अस्तित्व नाही, तर मग आता हे शब्द कोणी दिले तोंडात? लेखक महोदयांनी! पण गंमत अशी आहे की अजून तर नुसती पात्रं जमवलीत, लिहून व्हायचे बाकी आहे! तर माझ्या हे तोंडचे शब्द आले कुठून? हे ही लेखकानेच लिहिलेत? पण कधी नि कसे? आम्ही तर नुसते जमलो होतो लेखकाच्या आज्ञेनुसार. आम्हाला ना संवाद दिलेले ना स्वगतं. मग हा बोलणारा मी कोण? कोहम?

कौन हम?

(हॅट काढून परत डोकं खाजवतो..)

मला वाटतं मी परत निघतो आता. प्रश्न गहन आहे! माझ्या कर्त्या करवित्या लेखक महाशयांना ठरवू देत.. पुढे काय नि कसे ते.. निघतोच. कमीतकमी माझ्या तोंडी चांगली टाळ्यांची वाक्ये टाका म्हणावे! नाहीतर उगाच प्रोफेसर भोळे विसरभोळे म्हणून नुसताच विनोदविषय बनून राहणार काय?

ट्रिपल बी!

टू बी ऑर नॉट टू बी?

हा प्रश्नच नाही या ट्रिपल बी ला पडलेला. आय हॅव टू बी! नाटक जिवंत करायला नि ठेवायला, आय हॅव टू बी! नि त्यासाठी आय हॅव टू बी.. देअर! लेखकाच्या नजरेसमोर!

निघतोच!

(निघणार तोच लेखक आत शिरतो.)

**लेखक**: प्रोफेसर विसरभोळे. तुम्ही इकडे कुठे? चला.. ही पात्र जरा आगाऊच आहेत.

पण सगळी माझीच निर्मिती! सांगतो कोणाला!

(म्हणत प्रोफेसरांना हाताला धरून ओढून नेत निघून जातो. प्रोफेसर जाता जाता.. )

**प्रोफेसर**: हातास धरून घेऊन आलात.. आता हाताला धरून परत.. तूच कर्ता करविता.. आलिया भोगासी.. असावे सादर.. न करावा अनादर नियंत्याचा..

(पाठोपाठ डाकू रब्बरसिंग आत शिरतो.)

**रब्बरसिंग**: आलो परत!

मी पोलिसांना गुंगारा देणारा. लेखकाच्या कसला हाती लागतोय.

ऐकलीत एकेकाची मुक्ताफळे?

मी सांगतो ते एकच. मी मी आहे. अगदी नंबर वन डाकू. चंबळखोरे सम्राट डाकू रब्बरसिंग. कसली गोष्ट असेल कुणास ठाऊक. मला ठाऊक आहेत अजून काही पात्रं. एकेकाची ओळख पटायला पाहिजे. पण असली एकाशी एकाचा संबंध नसलेली पात्रं. कसली गोष्ट नि कसलं काय!

हा लेखकच होतकरू असणार.

जमवली पात्रं नि लिहायला बसले.. नाटक!

की नाटक लिहायचं नाटक नुसतं?

पण पाहिलंत त्या प्रोफेसरास? पांढरपेशे. नाटकात चार टाळ्यांची वाक्यं हवीत म्हणून लागले त्या बोरूबहाद्दरामागे. पण ह्या डाकूहृदयसम्राटास नाही कसली तमा ना टाळ्यांची हाव!

त्या बोरूबहाद्दरासमोर हा समशेर बहाद्दर वाकेल म्हणता? हॅट!

समशेर?

तशी मला शस्त्राची गरजच काय?

मी म्हणजेच एक शेर होतो!

मी म्हणजेच एक शस्त्र होतो!

तलवार काय की बंदूक काय? शस्त्रे स्वत: थोडीच काम करतात? त्यांच्यामागचा हात नि हातामागचा मेंदू काम करत असतो!

तर तो समशेर बहाद्दर म्हणण्यापुरता. नाहीतर आम्ही बंदूक नळी बहाद्दर! काय रूबाब! खांद्यावर बंदुकीचा तो दस्त्या. आत गोळी असो की नसो. नुसती पकडली खांद्यावर की लोकं चळाचळा कापायलाच हवीत. त्यात मी! म्हणजे आवाज काढण्यात उस्ताद! जंगलात राहून पक्ष्याप्राण्यांचे हुबेहूब आवाज काढतो मी. तर बंदुकीच्या गोळ्या न झाडता तिचा आवाज तोंडाने काढला तरी समोरचा गपगार! जो आवाजानेच निपचित पडतो त्यासाठी बंदुकीची गोळी कशाला वाया घालवावी?

कुणाची चाहूल लागतेय..

नाही तुम्हाला ऐकू नाही येणार!

तिथे पाहिजे जातीचे. इकडचे तिकडे खुट्ट झाले की ह्या रब्बरसिंगाच्या कानातून सुटायचे नाही. कुणीतरी आहे तिथे! चला लपूया.. येतोच परत! बघूयात कोण नमुना दिसतोय तो!

(डाकू पडद्यामागे लपतो. विदुषकी वेशातील कोणी कोलांटी उडी मारून आत शिरतो.)

**विदूषक**: मी! वेश असावा बावळा! त्यावरून ओळखलेच असेल.

मी विदूषक! नंबर वन!

म्हणजे तशी काही विदुषकांची स्पर्धा वगैरे नव्हती. कौन बनेगा विदूषक वगैरे! तशा अघोषित स्पर्धा होत असतात आजूबाजूला, राजकारणी वगैरे लोक भाग घेतात अहमहमिकेने! पण मी त्यांच्यातला नव्हे! मी खरा विदूषक! सर्वात फेमस एकच. मी! विदुषकांचा विदूषक!

हा! हा! हा!

सगळ्यात प्रथम, मी सुखी आणि आनंदी आहे! तुमच्या इतकाच!

उगाच माझ्या आयुष्यातले दु:ख लपवण्यासाठी मी लोकांना हसवतो वगैरे वगैरे काही नाही. दु:खाचं काय? ते सर्वव्यापी, पण आपण त्याला महत्व देऊ तितकेच ते छळते आपल्याला.

माझी ट्रिक मस्त! खाली डोके वर पाय!

आहे त्याच्या उलट गोष्टी पाहिल्या की दु:ख पाहाता जवापाडे नि सुख पर्वताएवढे!

शेवटी काय, कोणाला कसा काय धोबीपछाड द्यावा हे आपले ठरवावे आपणच! दु:ख पण त्यातच आले!

तर मी या नाटकाचा अविभाज्य भाग!

मला कसे ठाऊक विचारता?

तर सोपेय!

कुठेही गेलात तरी जेथे कोठे नाटका सिनेमात विदूषक असेल तर तोच सर्व व्यापून दशांगुळे वर चमकतो! त्यामुळे मी नाटकात महत्वाचा असणारच! मग कथानक काहीही असो.

शेवटी काय, लोकांना हसवणे नि हसवत ठेवणे महत्वाचे. लोकं इतके जगता जगता हैराण असतात ना की हसणे विसरतात! मग कुणीतरी त्यांना हसवावे लागते.

पण माझी कल्पना अशी की आपणच आपल्या आयुष्याची सूत्रे हाती घ्यावी, आपणच आयुष्यात हासू निर्माण करावं नि इतरांना ही हसवावे! होय की नाही? कशाला हवा हा उसना हसवणारा विदुषकाचा पांगुळगाडा?

ते एक राहू देत, तसं केलं तर मी होईन बेरोजगार! तर दुसऱ्या कोणाला पाहिलेत का इथे? नाही, म्हणजे लेखक आला नि धावून गेला. एक कोणीतरी वयस्क गृहस्थ आले हॅट घालून नि हळूच पळून गेले. मागे राहिलो मी नि अजून

काही जण. खूप वेळ झाला लेखकाचा पत्ता नाही म्हणून निघालो नि इथे पोहोचलो.

नाटकातील नव्हे तर खराखुरा ही विदूषकावतार मी!

विष्णूने विविध अवतार घेतले म्हणतात ना तसा मी, हास्यदेवाचा विदुषकावतार!

तुम्हाला सांगतो, लोकांच्या डोळ्यांतून दु:खाश्रू काढणं सोपं पण हसता हसता त्यांच्या डोळ्यांत पाणी यायला लावणं कठीण.

उगाच नाहीत विनोदवीर होऊन गेलेत मोठे त्यांच्या आठवणीत लोकांच्या डोळ्यांच्या कडा ओल्या होतात.

तर मी आलो असंच.

म्हटलं प्रेक्षकवर्ग कसा आहे ते एकदा पहावे! जमलं तर दोन घटका बोलून घ्यावं. नंतर आहेच लेखकाच्या शब्दांचा भार वाहणारा हमाल बनणे! आम्हा पात्रांना स्वत:चे काही अस्तित्व आहे की नाही? की उगाच खेळवावं लेखकानं हाताच्या बोटावर? मनास येईल तसं?

तुम्हाला पाहिलं नि बरं वाटलं.

दर्दींची गर्दी असण्यासारखं सुख नाही आम्हा नाटकवाल्यांसाठी. आणि आमच्या सारख्या पात्रांचा प्राणवायू तुम्ही लोक. मायबाप प्रेक्षक! आम्ही नसलो तर हा रंगमंच सुना नि तुम्हीच नसाल तर? त्याहून ही सुना! तेव्हा तुम्हीही नाटकाचाच एक अविभाज्य भाग आहात म्हणा! तेव्हा घालतो दंडवत. नि

मायबाप हो! अशीच कृपा राहू द्यात! रसिक प्रेक्षक आहेत म्हणून आम्ही सारे आहोत. नाहीतर हे सारे व्यर्थच नाही का?

मला वाटतं जायला हवे.

लेखक तिकडे सारा पसारा मांडून बसला असणार. पिसारा उघडून म्हणावे का? की डाव मांडून म्हणावे? जे काही असेल ते! शब्द शब्द जपून वापरायला मी थोडीच आहे लेखक! मी तर चार दोन उड्या मारेन, दोनचार गंमती करेन, पडेन, बागडेन नि निघून जाईन.. अर्थातच हक्काच्या टाळया घेऊन!

पण जाता जाता एक निरीक्षण तेवढे सांगून जातो. कोणाला कितीही हसवा, हास्यनगरीत बसवा, पण गंभीर काही तत्वज्ञान विवेचनात्मक बोलत नाही ना तोवर लोकं गंभीरतेने घेत नाहीत आम्हाला. जणू काही हास्य विनोदाचे म्हणून काही तत्व किंवा तत्वज्ञानच नाही नि हसण्यातून जीवनदर्शन घडवताच येत नाही! असो.

खरंतर विदूषक म्हणून इतकीच एक मनी खंत आहे आयुष्यभराची, पण तिला काही इलाज नाही!

उगाच कोण्या तत्वज्ञाचे कातडे पांघरून 'मला ज्ञानी म्हणा ना प्लीज' असे काही म्हणता येत नाही!

चला निघतो. हजेरी लावणे आहे. नाटकात पहिली एंट्री माझीच असणार. तेव्हा उगाच माझ्यामुळे खोळंबा नको.. काय? निघतो. भेटूच.

(कोलांट्या उड्या मारून निघून जातो.

रब्बरसिंग हळूच त्याच्याकडे पाहात बाहेर येतो. कुणाची चाहूल लागते नि परत पळत आत जातो.

शिट्टी वाजवत पोलिस आत येतो. चमकून समोरच्या प्रेक्षकांकडे पाहात अचानक उभा राहतो. गोंधळून शिट्टी फुंकतो.. सलाम ठोकतो.)

**इन्स्पे.साळुंखे**: पोलिसासारखा पोलिस मी. डाकू म्हणू नका, दरोडेखोर म्हणू नका, चोर पाकिटमार तर डाव्या हाताचा मळ.. कोणाला घाबरत नाही हा इन्स्पेक्टर सुभानराव साळुंखे. पण हे समोर असे लोक बसलेले नि काहीबाही बोलायचे तर भंबेरी उडायचीच. म्हणजे काय की चोराला पकडायचे तर वळायची गचांडी नि हाणायचे रट्टे. चार दोन शिव्यांत होतंय काम. पण इकडे? बोला. बोलत रहा. ते ही सभ्यतेने. शिवी नाही. अगदी ओवी नको, पण सभ्य भाषेत बोलणं काही सोपं आहे?

रांगडा पोलिस गडी मी. हे असलं काही जमायचं नाही.

मी तर घाबरलो. ह्या नाटकात कसला रोल मिळतोय कोणास ठाऊक. म्हणजे पोलिसाचाच, पण डायलॉग वगैरे जास्त नको. प्रत्यक्ष कृतीवर विश्वास ठेवणारी जमात आमची. क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे! उगाच बोलत नाही. लोकं कशी 'थोबाडीत देईन' वगैरे धमक्या देतात. प्रत्यक्षात वेळ आली तर गळपटतात. वर अहिंसा वगैरे तत्वज्ञान आलेच. कुणी म्हणाले ना, अहिंसेसारखी दुसरी हिंसा नाही! म्हणजे काय? शब्दांचा खेळ नुसता! अर्थ असो नसो! आजकालची स्टाइल आहे म्हणे ही!

शब्दांत शब्द गुंफून अर्थपूर्ण वाटेल असं निरर्थक काहीतरी बोलणे!

पण आमचे तसे नाही.

आम्ही म्हणजे.. स्वत:ला आम्ही म्हणवणारे दोनच असतात म्हणे, एक संपादक मंडळी नि दुसरे वेडे. आम्ही दोन्हीपैकी एक ही नाही! इथे आम्ही म्हणजे मी आणि पोलिसदलातील सहकारी. तर आम्ही धडक कृती करणारे! एक घाव शंभर तुकडे! कोई यहां गिरा, कोई वहां गिरा!

उगाच क्रियेवीण वाचाळता कशाला? गरजेल तो पडेल काय म्हणतात तसे आमचे नाही. पडता पडता गरजणारे आम्ही. किंवा गरजता गरजता धुंवाधार! दांडगाई आमच्या रक्तात भिनलेली. तेव्हा ही अशी सभ्यबिभ्य भाषा बोलताना जीभ वळत नाही. चिकटते. किंवा अडखळते म्हणा.

पण दिला थोडा डायलॉग नाटकवाल्याने तर बोलायला हवा! तेवढाच बदल. रूचिपालट म्हणा!

पण मला अंदाज आहे माझे काम काय असणार त्याबद्दल.

अहो, एक डाकू आणलेला त्या लेखकाने. डोळ्यांदेखत पळून गेला! त्याच्यामागे लावणार मला. किंवा मग कुणी नेता वा पुढारी असेल तर त्याच्या आगेमागे. बाकी पोलिसाला काम काय?

गंमत आहे की नाही? एकतर नाटकासिनेमात पोलिस एकदम कडक तरी असतो नाहीतर पैसेखाऊ तरी! अधेमधे काही नाही! जणू जागतिक पोलिसांचे दोन भागात विभाजनच करून टाकलंय ह्या लेखकांनी! मध्ये एक टीव्हीवर सिरियल होती, पोलिस नायक त्याचा. इकडे तिकडे गुन्ह्याचा शोध चाललाय.

कित्येक एपिसोडस् खर्ची घातल्यावर त्याचा सिनियर त्याला समजावून सांगतो, तिकडे गुन्हा घडलाय, तो कुणी केला याचा तुला शोध घ्यायचाय! आजवर तो काय लपाछपी खेळत होता? की छापाकाटा? असला निर्बुद्ध कारभार!

पोलिसांचा नव्हे, या लेखक म्हणवणाऱ्या मंडळींचा!

तेव्हा आमचे लेखक आमच्या तोंडी काय भाषा नि वाक्ये देतात पाहू!

चला!

खूप बोलून झालं आता बघतो, लिहायला सुरूवात केली की नाही ते. म्हणजे तो लेखक नाटकातलं पात्र पळून गेलं तर त्याच्या मागे पळाला म्हणे! मग अजून दोघे होते, चुळबुळत बसलेले, ते गेले नि मागोमाग मी पण निघालो, म्हटले बघू काय चालू आहे ते. नि पोहोचलो इकडे. पण आता निघायलाच हवे.

कदाचित एंट्रीलाच असेल रोल तर? कडक गणवेशातले इन्स्पेक्टर साळुंखे. अशी ऐटबाज एंट्री.. मग टाळ्या!

निघतोच..

तुम्हाला सांगतो तो सायरनचा आवाज, पाठोपाठ पोलिसांची गाडी नि त्यातून धडाधड उतरणारे पोलिस.. बघता बरोबर प्रेक्षकांच्या हृदयाचा ठोका चुकलाच पाहिजे!

एंट्रीच असेल माझी तर..

निघायलाच हवे..

(इन्स्पेक्टर निघून जातो. रब्बरसिंग बाहेर येतो.)

**रब्बरसिंग**: छ्या! असला पोलिस? मला नाटकातपण पकडू नाही शकणार. खराखुरा पकडण्याचा तर प्रश्नच नाही.

रब्बरको पकडना मुश्किलही नहीं नामुमकिन है! खरा हा डायलॉग माझाच. सिनेमावाल्यांनी उचलला. मग प्रसिद्ध झाला. चालायचेच! गब्बरचा भाऊ कमीतकमी इतके तर करूच शकतो! म्हणजे डायलॉगबाजीबद्दल बोलतोय मी! गब्बरचे तर कित्येक डायलॉग प्रसिद्ध आहेत. त्यामानाने मी मागे पडलो. लोक ओळखत नाहीत. ते बरंच आहे म्हणा.

तुम्हाला काय वाटते? अजून कोणी येईल? लेखक, मग प्रोफेसर, विदूषक नि पोलिस. आणि अर्थात त्या लेखकाच्या हाती लागलो तर मी! चौथे पात्र.

छे! एक दोन पात्रं अजून बाकी आहेत नक्कीच. पण सगळ्यांनीच एका मागोमाग यावं असा नियम थोडीच आहे?

(पावलांचा आवाज येतो. रब्बरसिंग कान देऊन ऐकण्याचा प्रयत्न करत करत आत जातो.)

एक नेता. मुखावर मोठे हास्य. पोट मोठे. जाकीट नि पांढरे शुभ्र परीटघडीचे कपडे. इकडे तिकडे पाहतो.

**गोडमगुंजे**: बंधुभगिनींनो, मी ना.गोवर्धनराव गोपाळराव गोडमगुंजे. गो.गो.गो.! आमच्या राजकीय शत्रूंस आम्ही गो गो गो म्हणून पळवून लावतो. त्यामुळे आम्ही प्रसिद्ध पावलो आहोत. आता नाटकात काय काम आमचे?

नाही, तुम्हाला म्हणून सांगतो, आमच्यासारखी नट मंडळी कोठे मिळायची नाही. जनतेसमोर जिवंत अभिनय, उत्स्फूर्त भाषणं नि जनतेस संमोहित करणे.. नाटकवाल्यांहून जास्त जिवंतपणे करतो आम्ही. राजकीय जीवन जगण्याची कला आमची जिवंत नि कौतुक कोणाचे तर नाटकीय नट मंडळीचे! असो.

आम्ही दिवसरात्र नाटक करत असलो तरी लोकांस जाणवत नाही ते. यातच आमच्या सारख्यांचे यश आहे. आता ही आलोय मी ते जनकल्याणाचे काम बाजूस ठेवून. जगाच्या कल्याणासाठी आम्ही. दिनरात मेहनत करत दिवसाची रात्र करत राबत असतो. कुणास आमच्या गाड्या दिसतील तर कोणास ताफा. कोणास दिसेल तो आमचा रूबाब तर कोणास अजून काही. पण आमच्या कामास अंत नाही. वयाच्या अठराव्या वर्षी जे लागलो कामास त्यास अजून खंड नाही. कितिकांचे भले केले त्यास नाही गणती. आता ही आला निरोप.

अगदी लाइव्ह नाटक करायचेय म्हणे.

म्हटले मग आम्हास पर्याय नाही!

माझ्याहून उत्तम दुसरा कोणी असेलच कसा?

त्या लेखकाने थांबवले तिथे नि स्वत: गायब झाला. म्हटले काय चाललेय ते पहावे.. तर इकडे दुसरे कुणीच नाही.

कुठे गेलेत कोणाला ठाऊक.

एक आहे, जाऊन ती खुर्ची पकडावी. राजकारणात एक खुर्ची सोडली तर दुसरं आहे तरी काय? राजकारण म्हणजे राज का रण! अर्थात किस्सा कुर्सी का!

तर मंडळी निघतो. तिकडे खुर्ची धरून बसतो. कुणी वाट लावू नये.. म्हणून बसतो नि बघतो वाट!

गोडमगुंजे जातो.. जाता जाता गुणगुणत

सब्र का फल मीठा रे भाई.. सब्र का फल रे मीठा..

हळूहळू अंधार होतो.

# २



(स्थळ: तेच.

एक मध्यमवयीन लेखक स्टेजवर आहे. टेबल आहे, खुर्ची आहे, एक टेबल लँप आहे. तो बसून लिहितोय, कागदाचा बोळा एक एक करून कचरापेटीत टाकतोय.. थोडा वेळ जातो. तो उठून इकडे तिकडे पाहातो. मग फेऱ्या मारत प्रेक्षकांकडे पाहात नमस्कार करतो..)

**खरा लेखक**: नमस्कार!

मी लेखक!

काय म्हणता?

लेखक आधीच येऊन गेलाय? तो वेगळा होता? अर्थातच.

तो वेगळाच असणार. कारण तो लेखक नव्हताच. नाही म्हणजे तो लेखकच होता पण असा लेखक नव्हता. गोंधळून जाऊ नका. मी खराखुरा

लेखक. नि तो मी लिहित असलेल्या नाटकातील लेखक. काय आहे की तो लेखक नाटक लिहिणार आहे. त्या नाटकावर माझे नाटक. म्हणजे मी लिहिन त्या नाटकात एका लेखकाला नाटक लिहायचे आहे, त्या नाटकाचा तो लेखक माझ्या नाटकात एक लेखक म्हणून आहे.. समजलं ना?

तर, मी नाटककार! खरा.

नि माझ्या नाटकातील तो लेखक एक पात्र!

तसा लेखक म्हणवून घ्यायला पात्र म्हणावा कारण मीच निवडलेले पात्र आहे ते!

आहे की नाही गंमत.

काय आहे, माझ्या या नाटकात त्या लेखकाला मी बसवणार आहे लिहायला. तो जो नाटकातला नाटककार आहे ना त्याला तीन दिवसांत लिहून संपवायचे आहे नाटक. म्हणजे त्याला तसा काँट्रॅक्ट दिलाय कुणी.

गंमत म्हणजे त्याला जी दिली गेलीत पात्रं त्यांनाच जुंपून गोष्ट गुंफायचीय! काय आहे हीच पात्रं उपलब्ध आहेत. त्यांची सोय लावा!

लिहा नाटक या पात्रांना वापरूनच.

निर्माते ना, कसल्या अटी घालतील सांगता यायचे नाही!

नाटकासाठी पात्रं नव्हेत, तर पात्रांसाठी हवंय नाटक!

आता त्या नाटककारास एका चांगल्याशा हॉटेलात उतरवले की प्रतिभा प्रसन्न होऊन सुचेल त्याला काहीतरी! हॉटेलात काय प्रतिभानिवास वगैरे असतो की का प्रतिभाविलास व्हावा म्हणून?

राहणार हॉटेलात तो, पण त्याला काय नि कसे सुचावे हे मला इकडे बसून सुचायला हवे! म्हणजे नाटकातल्या नाटककाराची सूत्रे हलवणारा मी, नि त्याच्याकरवी पात्रं हलवून घ्यायचीत, ती ही मीच! असं सगळं त्रांगडं आहे!

कसं जमावं? किंवा जमवावं?

नाही, म्हणजे आराखडा तयार आहे.

माझ्या कल्पनाशक्तीवर ओरखडा पडला नाही तर सगळी पात्रं एकात एक गुंफता येतीलही.

पण असं आधी पात्रं नि मग गोष्ट? ही काय गोष्ट लिहायची पद्धत झाली?

पण नाही!

चाल आधी नि मग त्यावर शब्द लिहून गाणी बनतातच ना?

एखाद्या नटास समोर ठेऊन नाटक लिहिलं जातंच ना?

कित्येक जण आधी निष्कर्ष नि मग त्यानुसार थियऱ्या मांडतात ना?

तर अशी सगळी उपलब्ध पात्रं घेऊन नाटक का लिहिलं जाऊ नये?

आणि ते खऱ्या नाटककाराने नाटकातल्या नाटककराकरवी लिहून का घेऊ नयेत!

पात्रं ही ठरवून दिलीत.

आता वापरावी ती पात्रं नि गुंफावी गोष्ट!

बघा म्हणजे मला सुचते ती गोष्ट अशी..

म्हणजे तशी बहुतेक सर्व पात्रं येऊन बोलून गेलीच आहेत. त्यामुळे त्यांची ओळख करून द्यायला नको. एक दोन आहेत त्यांचे काय करावे ते गोष्ट सुचत जाईल तसे बघावे.

आमचे लेखक महोदय. म्हणजे नाटकातले. तसे चांगले, पण हवालदिल.

कशामुळे?

तर दोन गोष्टी.. एक गेल्या दोन तीन वेळेच्या लेखनाचे पैसे बुडले. खेटे घातले तरी पैसे काही मिळत नाहीत. मागे त्याचे एक पुस्तक प्रकाशित झालेय, प्रकाशकाकडून हिशेबाचा पत्ता नाही. बरं पुस्तक प्रकाशित करून किती उपकार केले लेखकावर असा आविर्भाव.

कितीही साहित्यसेवक झाला तरी पोटाकरता पसा हवा नि त्याकरता पैसा हवा. देणाऱ्याचे हात हजारो खुशाल कोण्या कवीला वाटत असेल, पण इथे तर जे कोणी दोनचार त्याला देणारे हात आहेत त्यांनी ते आखडते घेतलेले. तशात यास मिळाले ते एक नाटक लिहायचे आव्हान. पात्रं तयार आहेत. दिवस फक्त तीन. बसा मांडी ठोकून नि नाटकाच्या घोड्यावर मांड टाकून! करा खोगीरभरती नि लिहा नाटक! बदल्यात मग मोजून घ्या मोबदला म्हणे!

नाटककार तसा रिकामाच आहे.

म्हणतो, दौडवीन प्रतिभेचे वारू नि उधळीन इतस्तत: असे की जन्मास यावे ते महानाट्य! त्या धुंदीत तो विदूषकास पाठवतो स्टेजवर. विदूषक म्हटले की टाळ्या हमखास. पडदा उघडताच! अजून काय हवे? विदूषक नाटकात येऊन जाऊन असणारच आहे. तो क्षणिक विरंगुळा देण्याचा प्रयत्न करेल. आयुष्यात तो महत्वाचा! आणि आयुष्याच्या धकाधकीत विरंगुळा क्षणिकच असायचा! आमचे ते प्रोफेसर भोळे, विसरभोळेपण हा स्थायी भाव, पण भोळेपणापेक्षा विसरभोळेपणा परवडला, नाही का?

तर प्रोफेसर भोळ्यांच्या घरी अडला दरोडेखोर दरोडा घालतो. तोच रिटायर्ड डाकू रब्बरसिंग. अडला बिचारा. रिटायर होऊन बसला, काम नाही नि कमाई नाही म्हणून दरोडा घालायला गेलाय. तो ही कोणावर? चक्क एका प्रोफेसराच्या घरी! काय मिळणार तिथे? नोटांच्या जाडजूड थप्प्यांच्या ऐवजी जाडजूड पुस्तके! लक्ष्मी ऐवजी सरस्वती? बिचारा वैतागणार नाही तर काय?

त्यात साळुंखे इन्स्पेक्टर प्रोफेसरच्या घरात शिरतो. रब्बरसिंगासमोर इन्स्पेक्टर! त्याबरोबर एक राजकीय नेता एकाएकी अवतरतो. अगदी हेलिकॉप्टरमधून. तेच आपले नामदार ट्रिपल बी! गोवर्धनराव गोडमगुंजे. आता हेलिकॉप्टर नाटकात कसे दाखवणार? ते बघता येईल, पण गोवर्धनराव चक्क पॅराशूट अडकवून थांबलेल्या हेलिकॉप्टरमधून उडी मारत उतरतात. डॅशिंग नेते म्हणून इमेज बनवावी म्हणून! इन्स्पे.साळुंखे कडक सॅल्यूट ठोकतात. रब्बरसिंग त्याबरोबर ओरडतो, देश का नेता कैसा हो, गोडमगुंजे जैसा हो! त्याबरोबर गोडमगुंजे ज्यांच्या घरी चोरी त्या प्रोफेसरांनाच समजवायला लागतात.. अगदीच रियलिस्टिक आहे!

पाठोपाठ विदूषक अवतरतो.. मग पात्रं सगळी वरखाली करायला लागतात.

आता यात एक ही स्त्री पात्र नाही?

निर्माता स्त्री द्वेष्टा आहे की काय?

एक क्रिकेटर पण आहे त्याला सामावून घ्यायचेय. नि एक कुत्र्याचे पिल्लू!

आता या पात्रांचे काय गोष्टीत लोणचे घालायचे? एखादा शिकारी कुत्रा असता तर डाकू रब्बरसिंग नाही तर साळुंखेबरोबर दाखवता आला असता, साधा कुत्रा असता तर मालकाला चाटणारा म्हणून देश का नेता गोडमगुंज्यांबरोबर फिट बसला असता. पण हे पिल्लू? निर्मात्याला हवेय म्हणून सोडून दिलंय त्याने हे पिल्लू. तशी राजकीय नेत्याची अंडीपिल्ली असा काही संदर्भ देता येईलही. त्या क्रिकेटरचे काय करावे? लिखाणातून चौकार षटकार ठोकायला लेखणी पुरेशी आहे. त्यासाठी बॅट कशाला? त्याची प्रेमकथा दाखवावी समांतर ट्रॅकवर, तर एकही मुलगी नाही नाटकात. ती घालू म्हटले तर नाट्यनिर्मात्याची परवानगी नाही!

आधी अंडं की आधी कोंबडी हा सनातन प्रश्न सुटेलही कदाचित पण हा आधी पात्रं मग नाटक असला तिढा कसा सुटावा?

आणि अजून एक.. हे कमी म्हणून विमा एजंट आहे एक. कुलकर्णी!

त्याला वापरा.. निक्षून सांगितलेय निर्मात्याने. विमा एजंट म्हणजे तसा विदुषकाबरोबर विरंगुळा म्हणून दाखवता येतो. पण त्या क्रिकेटराला कुठे ॲकोमोडेट करावा? नि कुत्र्याचे पिल्लू?

बालहट्ट, राजहट्ट नि स्त्री हट्टापाठोपाठ ही नवीन निर्माता हट्टाची श्रेणी निर्माण झाली की काय! आणि गंमत बघा..

नाटकातला तो लेखक थंड हवेच्या ठिकाणी जाऊन हॉटेलात बसून लिहिणार आहे नाटक.

नि प्रत्यक्षातला मी?

अर्थात नाटकातल्याला अगदी पंचतारांकित ताज नाहीतर ओबेरॉय मध्ये पाठवायला आपले काय जातंय?

निर्माता मारेल बोंबा, सेट तसा बनवावा लागेल म्हणून!

मारेना!

असल्या अटी घालतोय, मी पण काही कमी नाही!

जाऊन बघावे का?

म्हणजे थंड हवेच्या ठिकाणी? थंड डोक्याने विचार करावा का?

हवा थंड असेल तर डोके ही थंड होते का?

की फ्रिज मध्ये जाऊन बसावे?

थंड डोक्याने विचार करावा!

की कल्पना ही थिजतील तिथे?

बाप रे!

काहीही कल्पना येताहेत डोक्यात!


थिजलेल्या डोक्यात थिजलेल्या कल्पना!

थोडी जागापालट करायला हवी. म्हणजे वितळतील कदाचित! माझे डोके म्हणजे मेल्टिंग पॉट?

येतो जरा.. डोके खाजवून..

(खिशातील कंगव्याने डोके खाजवत निघून जातो.)

# ३.



(स्थान: तेच.

स्टेजवर खरा लेखक आहे. हातात कागद. पेन. डोकं खाजवत येरझाऱ्या घालतोय. मध्ये मध्ये खुर्चीत बसून लिहितोय काहीतरी. काय नि कसे लिहावे सुचत नाही अशा अविर्भवात फिरतोय. थोड्यावेळाने एक कवीसारखा दिसणारा माणूस आत शिरतो..

थेट सुरू करतो.)

**कवी**:

वाकवावे शब्द झडकरी

होऊन काव्यगढीचे गडकरी

तैसेचि लिहुनी जावे नाट्य पंढरी

बबु म्हणे

हाती झटकन घ्यावा बोरू
अन्य जनांचा करावा मोरू
अचंबित सारे लहान थोरू
बबु म्हणे

बा ऐक तू नाटककारा
लिहून जा ऐसा सातबारा
नावे होईल तो नाट्य उतारा
बबु म्हणे

**लेखक**: कोण तुम्ही?

**तो**: विचारलातच प्रश्न? आम्ही कोण म्हणून काय पुसता? नमस्ते. मी कवी बब्रुवाहन बुरकुंडे. ऊर्फ कवी बबु. तुम्ही लेखक दिसता.

**लेखक**: कशावरून?

**कवी**: कशावरून काय? लेखकाचे हवालदिलत्व तुमच्या झळकतेय चेहऱ्यावर. माझ्याकडे पहा. माझ्याच मस्तीत जगत शब्दांशी कुस्ती खेळणारा

मी! नाहीतर तुम्ही! शब्दांशी झगडणारे! पात्र पात्र कुठे ठेवू याचा विचार करणारे! मुळात ते पात्र नाटकासाठी पात्र आहे का हेच ठाऊक नसणारे!

**लेखक**: खरंय बाबा. दिलिया पात्रांने करावे सादर! न करावा अनादर.. निर्मात्याचा!

**कवी**: म्हणून एक सांगतो,

उचल लेखणी लिहून टाक
सुचत नसेल तर घे नवं टाक

नवं टाक बरं, नवटाक नव्हे.. नाहीतर सुटाल लगेच..

मान मोडून लिहून टाक
लेखणी नसेल तर वापर टाक

भावनांच्या शाईत बुडव शब्दांचे टाक
घुसळ रवी घेऊन, काढ लोण्यातून ताक!

बघा हां! एरवी ताकातून लोणी निघते, इथे लोण्यातून ताक सगळे काढून टाका.. अगदी पाकातून बनवावी साखर नि नवनीतातून काढावे ताक.. बबु म्हणे ढवळून काढावी दुनिया.. खाता खाता आलेपाक!

तर..

वापरून अशी शब्दास्त्रे धारदार चमकदार
लिहून टाक नाटकबिटक खुमास नि चटकदार

दे आपल्या पात्रांना उघडून नाटकाचा दरवाजा
होऊ देत जरा सगळ्या पात्रांचा गाजावाजा!

खरंय की नाही?

लेखक: पण तुम्ही एकाएकी येथे कोठून कसे उपटलात? या इथे मी एकटा होतो. नाटककार नेहमी एकटाच असायचा. तू .. तुम्ही उगवलात कोठून?

कवी: कोठून उगवला? (गात) रवी मी..

नव्हे, रवी नव्हे मी! जे न देखे रवी ते देखे बबु कवी!

लेखक: असे म्हणता? तर माझ्या नाट्यकृतीतील या पात्रांना कुठे बसवावे हे दिसत असेलच ना कविराज?

कवी: कविराज! काय म्हणालात? कविराज? खरंय! नसेल आमच्या शिरावर ताज, पण शब्दसृष्टीवर आम्ही करू राज! खुशाल! काव्यकल्पना वापरून आमचे येथे खात्रीलायकपणे नाटकात पात्रे फिट करून

मिळतील.. संपर्क कवी बबु.. अर्थात बभ्रुवाहन बुरकुंडे. दाहक, अ-दाहक वगैरे शब्दांचा शब्दवाहक! चपखल यमके व मुक्त छंद स्पेशालिस्ट! बोला! कुठे कोणास बसवायचे फिट? नुसते सांगा बसवतो नीट! आहेच तसा मी अगदी धीट!

लेखक: असं म्हणता? नाही म्हणजे न जमल्यास येईल झीट! तीन दिवसात एकेक पात्रास इडलीपात्रात बसवल्यासारखे बसवून शिजवायची आहे ही नाट्य पाककृती! त्यात एक पोलिस, एक डाकू, एक नेता..

कवी: एक डाकू असताना नेता वेगळा कशास हवा?

लेखक: नव्हे, ही अलॉटेड पात्रे आहेत. ती वापरायलाच हवीत. तर, एक विदूषक, एक विमा एजंट.. एक क्रिकेटर नि एक कुत्र्याचे पिल्लू..

कवी: इतकी सारी पात्रे?

लेखक: एक राहिलेच.. एक लेखक ही आहे. ह्या सगळ्यांची बांधून मोट..

कवी: काम न दिसे हे सरळसोट! पण काळजी नको..

लेखक: पण त्या आधी तुम्ही असे आगतुंकासारखे कसे आलात?

कवी: कारण साफ आहे! जे न देखे रवी ते देखे बबु कवी. आपल्याच बिरादरीचा अडलेला लेखनकर्मी दिसला अंतर्चक्षुंस आणि आलो निघून तडक, सोडून जमणारे यमक. म्हटले असेल धमक तर करावी सुटका अडलेल्याची. पण थोडे कठीण दिसतेय. म्हणजे काय की कुत्र्याचे पिल्लू काही नाटकात रोल मागायला येत नाही. ते कशाला इथे कडमडतंय?

लेखक: याची उत्तरे ठाऊक असती तर मला? पण आलिया भोगासी असावे सादर..

कवी: यस! मग काहीही म्हणोत आपले फादर! तशी आतापर्यंतची गोष्ट ऐकलीय मी लपून तिकडे तेव्हा पुनरूक्ती नको. तिथून पुढे.. एक क्रिकेटरचे पिल्लू नि एक कुत्रा ..

लेखक: नव्हे..

कवी: यस! दॅट्स नो! एक क्रिकेटर नि एक पिलू ऑफ कुत्रा.. गोष्टीत यांना काय द्यावे काम?

लेखक: असे ज्याने होईल काम तमाम!

कवी: वा! गुण लागला म्हणायचा कवीचा! तर पिलू क्रिकेट खेळतेय .. क्रिकेटर भो भो भुंकतो! भूमिकांची अदलाबदल! चिचच! म्हणजे चित्तचक्षुचमत्कारिक!

लेखक: नि चमत्कारिक देखील!

कवी: पण हे कवीस अलाऊड आहे. नाटककारास नाही. तुमचे पाय जमिनीवरच हवेत. आणि आम्ही कवी लोकं आकाशात चालू शकतो, जमिनीवर उडू शकतो, पाण्यावर विमान उडवू शकतो! शेवटी साऱ्या कल्पनेच्याच भराऱ्या तर मारायच्यात! एका कवितेत तर मी आकाश पिऊन हिमालय गिळलाय!

लेखक: सगळे मान्य. पचवून ढेकर पण दिला असेल! पण आता मुद्दा हा की काय करावे या क्रिकेटराचे?

कवी: आयडिया!

लेखक: क्रिकेटराची आयडिया? काय की बुवा!

कवी: तसं नव्हे, माझ्याकडे आहे एक आयडिया! तुमचे ते प्रोफेसर विसरभोळे..

लेखक: नुसते भोळे. विसरभोळेपण हे विशेषण! गुणविशेष! प्रा.भोळे हे नाम!

कवी: असेल. कवीस जगाचीच नसेल तर जगाच्या नि जगायच्या व्याकरणाची तरी काय तमा? कवी मुखत्यार आहे वापरण्यास कोणताही शब्द कोठेही!

लेखक: छान! तेवढे ते पात्रनियोजन..

कवी: आयोजनाचे नियोजन बाणा कवीचा असे! समजलात का नाही कसे? तर ऐकावे..

लेखक: बोलावे कविवर्य!

कवी: वा! काय शब्द योजना! कविवर्य! सुखावती कान, वाढवीत मान! आम्ही असू लाडके सारस्वताची शान!

लेखक: क्रिकेटराचे नि श्वान पिलाचे करावे काय?

कवी: सोपेय! क्रिकेटर हा भोळेपुत्र! नि ते त्याचे पाळीव श्वानपिल्लू!

लेखक: वा! पण त्यांचे कथेत काय काम?

कवी: ते ठरवता येईल. पण निदान गोष्टीत या पात्रांना शिरकाव तर करून देता येईल असा!

लेखक: होय! कमीत कमी दरवाजा तर किलकिला होतोय. त्यातून या पात्रांसाठी आशेचा किरण येऊ शकतो!

कवी: थोडी तपशिलातील चूक. आशेचा किरण येतोय तो लेखकासाठी! पात्रांना काय? पडून राहतील गुपचुप नाहीतर येणारच नाहीत स्टेजवर! लेखक: खरंय! मीच त्यांचा जन्मदाता, मीच त्यांचा त्राता! मज वाचून त्यांना तारणार कोण? ठरले तर मग. क्रिकेटर हा भोळेंचा मुलगा. त्याच्या हाती तर श्वानपिल्लू. पण कथानकात त्यांचे काय काम? यस्स.. गोगुं म्हणजे नामदार गोडमगुंजे सवयीप्रमाणे भाषण ठोकायला लागतो. तिकडून आपला क्रिकेटर येतो. गोगुं ऐकत नाही पाहून तो कुत्र्याच्या पिल्लास कानात काही सांगतो. मग गोगुं पेक्षा वरचढ आवाजात कुत्रा भुंकायला लागतो!

**कवी**: मग विमा एजंट कुलकर्णी सांगतो, नवीन पॉलिसी घ्या. श्वानदंशाने मृत्यू झाला तरी यात पैसे मिळतात!

**लेखक**: वा! इथवर तर जुळताहेत कोड्याचे तुकडे! कमीतकमी सर्व पात्रांची सोय तर झाली. बाकी तपशील म्हणजे आराखड्यात बांधायच्या भिंती. विटांवर वीट रचत उभारायचा नाट्याचा इमला! वा! कविराज! तुम्ही आलात नि..

**कवी**: विचारगंगा वाहती झाली! म्हणजे आम्ही शब्दसृष्टीचे प्लंबर की काय? एक ध्यानात ठेवावे लागेलच, लेखक नि कवीचा संसार म्हणजे शब्दांशी खेळ.

छद्मीपणे कुणी शब्दच्छल म्हणेल तर कुणी काही. पण आपण शब्द वापरावेत जपून..

शब्द तारती शब्द मारती
अर्थ शब्दांचे कुणा भारती
पकडा अचूक जणू घार ती
बबु म्हणे

सांभाळावी म्हणुनी रसना
ऐसी करावी सदा रचना
करू नये शब्द वंचना
बबु म्हणे

वळवावी तैसी वळे वैखरी
जपूनी मग ठेवावी बरी
नाही तर गोष्ट नसे खरी
बबु म्हणे

कवितेच्या घोड्यावर स्वार होताना रिकिबीत सांभाळून पाय घालावाच लागतो! तेव्हा कुठे खोगीर भरती करता येते! निघू मी?

**लेखक**: घोड्याचे उदाहरण देताय.. घोड्यावर आलात जणू!

**कवी**: जगभर ऐशा समस्यांचे निराकरण करण्यासाठी संचार माझा! कारण

शब्द हाच छंद,

शब्द हाच नाद..

नाही आपुलाला वाद..

बबु म्हणे!

**लेखक**: कविराज! धन्यवाद! तुम्ही आलात नि जणू एका कोड्याची उकल केलीत. आता सुसाट सोडतो लेखणी.. लिहून टाकतो..

**कवी**: मी झणी.. नाट्याक्षरे ऐसी गुणी..

मी निघतो.. माझे अंतर्चक्षू मला दाखवताहेत, कोठे कोठे अडलेले लेखक अन कविगण. जगाच्या कल्याणा माझी ही उत्पत्ती.. अडलेल्या नडलेल्या, कुणीतरी नाडलेल्या.. लेखक कवींनो, येत आहे उद्धरण्या.. हा तरण्या.. कवी बबु! मुक्त छंद अन यमक स्पेशालिस्ट! (जाता जाता) आमचे येथे अडलेल्या कथानकांची पाईपलाईन स्वच्छ करून पाणी वाहते करून दिले जाईल. ग्यारंटीने. भटको चाहे जिधर काम होगा उधर.. बाबा बबु बंगाली. गगनी रवी, भूवरी कवी.. कवी बबु.. आजच संपर्क करा .. कवी बबु.. टिंग टाँग!

(निघून जातो.)

४

स्थान: एका आलिशान हॉटेलातील हॉल. सर्व पात्रे खऱ्या लेखकाच्या येण्याची वाट पाहात बसलेली आहेत, रब्बरसिंग सोडून. नाटकातील लेखक, विदूषक, गोडमगुंजे, इन्स्पे.साळुंखे आणि विमा एजंट कुलकर्णी, क्रिकेटरच्या वेशातील एक तरूण हाती कुत्र्याचे पिल्लू घेऊन..

गोडमगुंजे: च्या मारी! अजून कुणीच नाही आलं इथे? लेखक गेला कुठे? आमचा खोळंबा? आमचा एकेक क्षण महत्वाचा. तिथे इतका वेळ वाया घालवावा? अरे आम्ही गोवर्धनराव गोडमगुंजे! कामदार आमदार नामदार!

- कोण रे तो जमादार म्हणाला?

नामदार गो.गो.गोडमगुंजे. जगाच्या कल्याणा आमची विभूती. जनकल्याण हा ध्यास, जनकल्याण हाच श्वास.. जनकल्याण हीच आस..

विदूषक(हळूच): येतोय आम्हांला वास.. घेऊ नका आमचा घास..

विमा एजंट: नको नको उगाच त्रास! तासन तास!

गोडमगुंजे (दुर्लक्ष करत): त्यात इतका वेळ आम्ही या ठिकाणी वाया घालवावा? इतक्या वेळात आम्ही कितिकांचे भले केले असते.

प्रा.भोळे: गोडमगुंजे साहेब, तुमची तळमळ समजू शकतो आम्ही.. भल्याची तळमळ. इतरेजनांच्या. आधी केले मग सांगितले! नि चांगल्या कामाची सुरूवात स्वत:पासून करावी! स्वत:चे भले न झालेला अन्यांचे काय भले करणार? अगदी तार्किक आहे ते.

इ.साळुंखे: साहेब, कडक सॅल्यूट! तेवढं नंतर बदलीचं ध्यानात ठेवालच तुम्ही. सध्याचं पोस्टिंग ठीक पण 'त्या' ठिकाणची बातच कुछ और.

गोडमगुंजे( दुर्लक्ष केल्यासारखे): पण या लोकांना काही आहे का? खोळंबा झालाय सर्वांचा. लेखकाचा पत्ता नाही.

नाटकातील लेखक: मी इथे आहे साहेब. पण तेवढं ते साहित्य संस्कृती मंडळावरच्या नियुक्तीबद्दल बघून घ्या साहेब. आणि लिखाण म्हणाल ना तर तो रब्बरसिंग.. परेशान करून ठेवलंय त्याने!

(रब्बरसिंग पडद्याआडून स्टेजवर शिरतो..)

रब्बरसिंग: देश का नेता कैसा हो.. गोडमगुंजे जैसा हो.

अरे येऊन येऊन येणार कोण? गोमडगुंजेंशिवाय आहेच कोण?

गोडगमुंजेसाब आगे बढो, हम तुम्हारे साथ है..

गोजमगुंडे अंगार है.. बाकी सब भंगार है..

गोडमगुंजे: लेखक महोदय, बघा. असे होनहार होतकरू आमचे पाठिंबक असताना त्यांना डाकू कोणी कसे म्हणावे?

लेखक: अरे रब्बरसिंगा! तुझ्यापायी वेळ गेला वाया..

गोडमगुंजे: लेखक महोदय, अदबीने बोला, ते आमचे पाठिंबक आहेत.

प्रा.भोळे: तर्कशास्त्राचा विचार करता, पाठिंबा देणाऱ्यास पाठिंबक म्हणणे योग्य! नि पाठिंबकास पा-ठिंबक सिंचन करून संरक्षण हा विचार अतार्किक नाही. तर्काने विचार केल्यास, किंबहुना, त्यासाठीच तर हा डाकू वर्गाचा अट्टाहास. तोही अगदीच जस्टिफायेबल म्हणावा.

गोडमगुंजे: जस्टी.. म्हणजे मामला कोर्टाच्या अधीन असताना आम्ही त्यावर प्रतिक्रिया नाही देऊ शकणार! एक वाक्य आम्ही पाठ करून ठेवलेय! म्याटर इज सबज्युडिस! आणि तसे ही आम्हास कोणाच्या प्रश्नांची उत्तरे देण्याची सवय नाही. कोणाला आम्ही प्रश्न विचारू देत नाही. आम्ही आमच्या मतदारसंघाचे सर्वेसर्वा असताना कोणी का आमच्या कार्यास प्रश्नरूपाने आडवे यावे? म्हणून आम्ही पत्रकाररूपी मांजरांस उभे किंवा आडवे जाऊ किंवा येऊ देत नाही.

कुत्र्याचे पिल्लू: भो भोss .. भो भोss

गोडमगुंजे: हे का भुंकतंय?

क्रिकेटर: मांजर म्हटलं की कुत्रं पाठी राहतय होय? शूरसेना.. भुंकू नकोस. हे ताटाखालच्या मांजरांबद्दल बोलताहेत. खऱ्याखुऱ्यांबद्दल नाही..

विमा एजंट कुलकर्णी: शूरसेन? हे कोण?

क्रिकेटर: कुलकर्णी, अर्थात ह्या श्वानपिल्लाचे नाव ते. शूरसेन ऊर्फ पराशर भोळे!

कुलकर्णी: दोन नावे?

क्रिकेटर: नव्हे तीन! जांबुवंत भोळे हे तिसरे नाव! एक जन्मनाव, एक पाळण्यातील नि एक वापरातील!

विदूषक: पाळण्यातील नाव, एका कुत्र्यास? बाळ आहे तर पाळ आहे.. पाळ म्हणजे पाळणा!

प्रा.भोळे: अर्थात. हे तर्कास धरून आहे!

गोडमगुंजे: का नसावे? सर्वांचाच विकास! त्यात मग ह्या कुत्र्याने काय घोडे मारले?

विदूषक: घोडे? तो तर मांजरास मारतो! नुसते मार्जारवर्गीयांचे नाव ऐकले तरी कान टवकारून गुरगुरत घसा साफ करून घेणारा श्वानवर्गीय तो गूरसेन..

क्रिकेटर: नव्हे. (लाडाने) आमचं नाव शूरसेन. हो की नाही शूरसेना?

गोडमगुंजे: असेल. शूर सेन.. वीर सेन ही असेल. पण आपला इतका खोळंबा? नाट्यलेखकास आपली चिंता नाही! आपल्या अमूल्य वेळेवर राजरोस दरोडा?

रब्बरसिंग: दरोडा? कुठे घालायचाय साहेब? कितीतरी दिवसात नाही घातला डाका.. कितीतरी दिवसात आला नाही प्रसंग बाका..

प्रा.भोळे: वा! डाकूहृदयात कोवळा काव्यांकुर! मानवी मन तर्काच्या बाहेर असावे हे अतार्किक म्हणावे का?

क्रिकेटर: बट डॅड, ही वाँटस टू थ्रो दरोडा स्टिल. सी.. यू कॅन टेक अ मॅन आऊट ऑफ अ डॅकाईट बट नॉट द डॅकॉईट आऊट ऑफ अ मॅन!

प्रा. भोळे: अगदीच तर्कशास्त्रास धरून! बेटा, शोभतोस मुलगा माझा. शेवटी सारे जीवन हे लॉजिकवरच अवलंबून आहे! तर्क हाच जीवनाचा अर्क आहे बरं!

गोडमगुंजे: पण या ठिकाणी प्रश्न हा आहे की आपली विहित कर्तव्ये दाखवत नाट्यरूपात सादर करणारा कर्ताकरविता तो नाटककार गेला कुठे? आम्ही हा प्रश्न जनता जनार्दनापुढे उपस्थित करू. जनतेचे न्यायालय हेच सर्वोच्च! त्याच मायबाप जनतेने गेली पंधरा वर्षे ही जनसेवेची संधी दिली.आम्ही मनोभावे ती साधली.

कुलकर्णी: यथार्थ! पण तुम्ही तुमच्या खुर्चीचा विमा काढला आहात की नाही?

विदूषक: आयुर्विम्याच्यासारखा खुर्ची विम्यास पण पर्याय नाही की काय? कुर्सी के साथभी और कुर्सी के बाद भी?

गोडमगुंजे: कुलकर्णी, असतो का हो असा काही विमा? असता तर किती बरे झाले असते! कुर्सी के साथ और कुर्सी के बाद भी! वा! लेखक..

नाटकातील लेखक: ऐकतोय! खरंतर मी माझ्या बोलवत्या म्हणजे लिहवित्या धन्याची वाट पाहतोय. त्याने सुरूवात केली की मी देखील सुरूवात करेन. तोवर या पंचतारांकित हॉटेलात वाट पाहाणे आले!

कुलकर्णी: वाह!

विदूषक: अरे हुजूर, वाह ताज कहिए!

लेखक: पण या हॉटेलात चहा देखील तीनशे रूपयांस मिळतो म्हणे!

गोडमगुंजे: आम्हाला मत द्या. आज या ठिकाणी आम्ही आश्वासन देऊ इच्छितो की निवडून आल्यावर आम्ही प्रथम चहा स्वस्त करू.

कुलकर्णी (हळूच): फक्त कर अतिरिक्त राहिल.. चहाच्या किंमतीच्या तीनशे टक्के!

गोडमगुंजे: पण खराखुरा लेखक कोठेय? आजवर आम्ही सभेच्या ठिकाणी उशीरा गेलो. ताटकळत आमची वाट पाहात उन्हापावसात उभी राहणारी सामान्य जनता पाहिली. जनसामान्यांच्या कामात कार्यबाहुल्याने सभास्थानी आम्हांस देर होणे स्वाभाविकच आहे.

विदूषक(हळूच): गर्दी जमेतोवर वेळ लागायचाच!

गोडमगुंजे: आणि आमच्यासारख्या आम्हास ताटकळवत ह्या निरूपद्रवी लेखक जमातीतील कोणी उशीर करावा? अक्षम्य!

प्रा.भोळे: तार्किक!

विदूषक: आणि लेखनकार्मिकासाठी मार्मिकही!

गोडमगुंजे: आज या ठिकाणी आम्ही आश्वासन देतो..

विदूषक(हळूच): की यापुढे आश्वासने देणे बंद!

कुलकर्णी: साहेब, प्रत्येकाला विमा पॉलिसी कम्पलसरी करा. म्हणजे ह्या भोळे साहेबांना, त्यांच्या भोळया शूरसेन कुत्र्याला नि या त्यांच्या नॉट सो भोळया मुलालादेखील!

क्रिकेटर: कुत्रा? आमचा फॅमिलीमेंबर आहे तो. हो की नाही शूरसेना?

(कुत्रा भो भो करून भुंकतो.)

क्रिकेटर: पहा लबाड कसा हो बोलतोय!

विदूषक: हो बोलतोय की भो बोलतोय?

कुलकर्णी: काही असो. हो भो की पो! ह भ प कीर्तन करताहेत! त्यांना खो द्या! लेखकास बोलावणे धाडा. पात्रे सर्व कंटाळलीहेत!

गोडमगुंजे: या ठिकाणी आम्ही हे सांगू इच्छितो..

साळुंखे: साहेब, थोडा वेळ द्या. मी शोध घेऊन येतो की आता सगळी पात्रं जमली आहेत तरी असा उशीर का होत आहे? बंदोबस्त चोख आहे. घेतली ही रोख आहे. तरीही उशीर?

रब्बरसिंग: आता मला दोष नाही देता येणार फोल! लेखकाने केला उशीर तर आता लावा त्यास बोल!

प्रा.भोळे: तार्किक अगदी! अगदीच तर्कास धरून. रब्बरा ताणलास तरी तुटू नकोस..

विदूषक: पण तुटेपर्यंत ताणू नका म्हणजे झाले!

कुलकर्णी: आणि त्या आधी रबराचा विमा उतरवा म्हणजे झाले!

रब्बरसिंग: काय हो एजंट? ह्या निवृत्त दरोडेखोराचा विमा उतरवता का?

कुलकर्णी: उतरवूया की! नाहीतर चढवूया!

साळुंखे: का हो नाटकातले लेखक, काय प्लॅन असणार? नाही म्हणजे आपण सगळी एकाच गोष्टीतली पात्रं..

विदूषक: एकाच माळेचे मणी म्हणा ना!

लेखक: मला काय ठाऊक. मी बोलाचाच लेखक नि बोलाचाच नाटककार! बोलविता धनी वेगळाची! आता फक्त वाट पाहणे उरले आहे!

कुलकर्णी: तोवर ही एक पॉलिसी बघून टाका. काय आहे जीवनाचा भरवसा नाही. आज आहे उद्या नाही. तेव्हा उतरवा विमा..

साळुंखे: ए विम बार वाल्या.. चूप थोडा. विमा कसला तुझी आरती उतरवतो. उगाच जिंदगी के बाद भी! भुताटकी की काय? एकतर खोटी कामाची. सिग्नलला उभे राहिलो असतो तो आतापर्यंत.. (एकाएकी चपापत गप्प होतो)

विदूषक: यह वक्त वक्त की बात है!

गोडमगुंजे: खरंय. या ठिकाणी आपल्याला उशीर होत आहे.

लेखक(त्याच टोन मध्ये): तरीही सर्व भाऊभगिणींस सांगणे आहे की लवकरच आपले मान्नीय आदर्णीय वगैरे णीय लेखकमहोदय येत आहेत. आपण स्थानापण्ण व्हा. काही अपरिहार्य व अनिवार्य कामामुळे लेखक महोदयांस येण्यास विलंब होत आहे.

विदूषक: आपकी असुविधाके लिए खेद है.. शीघ्रही उत्तर की अपेक्षा है. कृपया प्रतीक्षा कीजिए.. टिंग टाँग!

क्रिकेटर: व्हॉट? युवर कॉल इज इम्पॉर्टंट टू अस? काइंडली वेट? ऑल अवर रायटर्स आर बिझी विथ समथिंग एल्स? बट हाऊ इज धिस हॅपनिंग? टायमिंग इज ऑल दॅट इज इम्पॉर्टंट! एल्स यू विल मिस द बॉल.

प्रा.भोळे: व्हेरी लॉजिकल माय सन..

विदूषक: वेळोवेळी मी हेच सांगत असतो, वेळ भरल्याशिवाय वेळ येत नाही..

लेखक: विदूषका, इतक्या वेळा मान वेळावून बोलू नकोस.. आपला मान राखायचा असेल तर मान सदैव ताठ ठेवा..

विदूषक: ओके सर, मान या न मान!

(कुत्रा दूर पाहून भुंकायला लागतो.. सगळे पहायला लागतात. कुणीतरी येताना दिसतो.)

गोडमगुंजे: कोण असेल? आमच्या सभेच्या ठिकाणी आम्ही पोहोचलो की सगळीकडे चैतन्य पसरते. कार्यकर्त्यांचा जल्लोष होतो सगळीकडे. कधी तर फटाके फुटतात!

प्रा.भोळे: अर्थात. लॉजिकल. नेत्याच्या येण्याने जनमानस फुलून येणं.. तार्किक दृष्ट्या योग्य. पण माझा लॉजिकल विचार मला सांगतो, ती दूरवरून येणारी व्यक्ती म्हणजे आपण जिची वाट पाहतो आहोत तीच असणार. नाहीतर आता इथे कोण येणार?

क्रिकेटर: यस डॅड. इट्स अ स्ट्रेट बॉल.. हिट इट फॉर अ सिक्स!

(क्षणभर अंधार. परत उजेड होईतोवर ती व्यक्ती, म्हणजे खराखुरा लेखक येऊन पोहोचतो..)

५



(लेखक (खराखुरा) घाईघाईत पोहोचतो. सर्व पात्रे उठून उभी राहतात. नेता सोडून.)

प्रा.भोळे: किती उशीर? नॉट लॉजिकली करेक्ट. दिरंगाईने कारभार बिघडतो.

विदूषक: गोडमगुंजेंस विचारा! पण ते नाही कबूलणार. दप्तर दिरंगाई ही सरकारांची देन आहे. हा शब्दच सरकार कृपेने मराठी भाषेस अलंकृत करण्यासाठी मिळाला आहे. तेवढाच माय मराठी संवर्धनाचा प्रयत्न! सरकारी!

कुलकर्णी: विमा उतरवा भाषाकारांचा!

खरा लेखक: सॉरी पात्रांनो. मनापासून सॉरी. काय झाले, की पात्रे तर जमलीत, पण पुढे काय? याचा विचार करताना नाटकाऐवजी कविता सुचली. ती रचित बसलो तर झाला उशीर! पण फिकिर नको. आज कवी बबु कृपेने नाटकाची कोंडी फुटलेली आहे. सर्व पात्रांस त्यांच्या पात्रतेनुसार पात्र वाटप करून झालेले आहे..

प्रा.भोळे: बबु? हे कोण? असू देत, पण आधी तुम्ही कवितेबद्दल बोलत होतात?

खरा लेखक: ऐकायची आहे तुम्हाला?

नाटकातला लेखक: कां नाही! (हळूच) तितकेच लेखक महाशय किती पाण्यात आहेत याचा अंदाज येईल!

विदूषक: म्हणजे नाट्यरूपी तलावात शब्दांची वल्ही मारून ही नवनाट्यनौका कशी पैलतीरी नेता नि नांगरता ते उदाहरणादाखल बघता येईल!

खरा लेखक(दुर्लक्ष करत): तुमचा आग्रहच आहे तर ऐकवतो.. नाटककारास कधी कधी कथाकल्पना सुचत नाहीत जसे एखाद्या कवीस कधी शब्द सुचेनासे होतात! त्या अनामिक उद्विग्नतेतून आलेला हा एका नाटककाराच्या नाट्य-कवी मनाचा हळुवार हुंकार आहे! ऐका..

एक कवि आहे चिंतित
कविता करतो कधी किंचित
यमकापासून नको वंचित
शब्द जुळविणे एकच संचित

शब्द मागायला गेला दारोदार
द्या जरा कुणी होऊन उदार
प्लीज! तुमच्यावरच माझी मदार
कुणी हसे, कुणी तोंडावर लावती दार

म्हणे शब्द देता का शब्द कुणी
तसा देवाचा लाडका मी सद् गुणी
एखाद दोन द्या यमकवाले, राहीन ऋणी
माळीन शब्द कवितेत, त्यांची गंमत दुणी

द्या ऐसे शब्द जे न कधी देखे रवी
प्रभू मी शब्दांचा घुसळेन शब्द, घेऊन रवी
शब्द शब्द जोडून बनवीन कविता रोज नवी
असली असली की सारे म्हणतील मला हवी

पण हाय रे दैवा! न सापडे शब्द एकही
बसेल चपखल कुठे अन् बनेल ओळ सही
घुसळे कितीही ताक तरीही उरतेच दही
काय करू म्हणे.. कुछ सुझता ही नहीं

ही माझी अवस्था होती. फक्त शब्दांच्या ऐवजी कथा कल्पना नि कवीच्या जागी मी स्वत:!

प्रा.भोळे: वा! नाटककाराची कवी कल्पना!

क्रिकेटर: डॅड, बट इज धिज लॉजिकली लॉजिकल ऑर इल्लॉजिकली इल्लॉजिकल?

प्रा.भोळे: माय सन.. हे तार्किक आहे! विचार कर. सर्व पदार्थ समोर ठेवले आहेत. डाळ, गहू, चिंच, तांदूळ, साखर, गूळ, तिखट, मसाला वगैरे. नि सांगितले, हे वापरून बनवा एकच पदार्थ! तर कोणी ही आचारी कितीही एक्स्पर्ट का असेना, गोंधळणारच!

क्रिकेटर: ट्रू डॅड!

विमा एजंट: पण म्हणजे तुम्ही आपली तुलना वेगवेगळया पदार्थांशी करताहात की काय?

विदूषक: मी साखर! हे कुलकर्णी.. चिंच!

साळुंखे: मी तिखट जाळ मसाला!

कुलकर्णी: पण मी का आंबट?

नाटकातला लेखक: कारण कोल्ह्याला चिंच आंबट!

खराखुरा लेखक: ऐका.. पुढे बोलू द्या..

साळुंखे: साहेब, घ्या सरसर हातात पेन नि लिहा झरझर नि मोकळे करा आम्हांला भरभर.

गोडमगुंजे: होय! जनकल्याणासाठी आमचा प्राण तळमळतोय. वाट पाहून इतका वेळ कंठाशी आलेला तो. त्यास कष्टाने कंठातून बाहेर पडू दिले नाही. नाहीतर आमच्या सर्व कार्यकर्त्यांनी कोणाच्या तोंडाकडे पाहावे? लाखांचा पोशिंदा जगला पाहिजे! त्याच लाखांच्या जिवावर का होईना! आता कुठे माझ्या जिवात जीव आला. तेवढा नाटकात चांगला रोल लिहा. आमचे प्रतिमावर्धन अन त्या विरोधक बुडकुल्या-चिंदेंचे प्रतिमा भंजन करा.

रब्बरसिंग: देश का नेता कैसा हो? गोजगमुंडे जैसा हो..

येऊन येऊन येणार कोण? गोमडगुंडें शिवाय आहे कोण?

विदूषक: बाकी सब भंगार है..

कुलकर्णी: गोजममुंडे अंगार है. बाय द वे! त्या अंगारांच्या आगीत होरपळलेल्यांसाठी विमा कवच घ्या! विमा पॉलिसी इज द बेस्ट पॉलिसी!

रब्बरसिंग: लेखक साहेब, मला खरा दरोडा घालू द्या! हात शिवशिवताहेत!

विदूषक: दरोडा! बँक ऑफ बरोडावर घाल! आणि स्वत:ची बँक बनव.. बँक ऑफ दरोडा!

साळुंखे: माझ्यासमोर दरोडेखोरीच्या गप्पा मारताहात? साहेब, ऑर्डर देत असाल तर टाकतो आत..

नाटकातला लेखक: सर्व पात्रांनो इकडे लक्ष द्या! आपला कर्ता करविता, लिहिता बोलविता कुणी दुसराच आहे! आपण ह्या खेळातील एक प्यादे आहोत!

गोडमगुंजे: बिलकुल अमान्य! आम्ही प्यादी सरकवणारे किंवा दामटणारे आहोत. स्वत: प्याद्याच्या रोल मध्ये? कधीच नाही!

नाटकातील लेखक: जशी लेखकाची इच्छा! हे नाट्य व्हावे ही ह्या लेखकांची इच्छा!

प्रा.भोळे: राइट! लॉजिकल आणि करेक्ट!

खरा लेखक: पात्रांनो आणि पात्रींनो ..

क्रिकेटर: पात्री? नॉट अ सिंगल गर्ल हिअर! सो बोअरिंग. नाहीतर स्टेडियम मध्ये आजूबाजूला असणाऱ्या तरुणींचे तांडे.. त्यासाठी तर आणि त्यासाठी तरी क्रिकेटर व्हावे माणसाने..(प्रा.भोळेंकडे पाहात चपापत गप्प बसतो..)

विदूषक: प्राध्यापक भोळे, भोळेपणाने ऐकू नका, सांगा हे लॉजिकल आहे की इल्लॉजिकल?

नाटकातील लेखक: खरं तर हे दिललॉजिकल आहे!

खराखुरा लेखक: तर पात्रांनो.. आता मी सुरूवात करेन. सर्वांनी आपापल्या जागी स्थिरस्थावर व्हावे..

(सर्व बसतात. खरा लेखक सर्वांना कथाकथन केल्यासारखा प्लॉट समजावून सांगायला लागतो. सारे ऐकताहेत. कुणी कुणी त्याप्रमाणे रिॲक्ट करताहेत. पाठून फक्त फास्ट फॉर्वर्ड केल्यासारखा बोलण्याचा आवाज.. काहीवेळ हे सुरू राहते.. थोड्या वेळाने..)

विदूषक: वा! अपेक्षेप्रमाणे मी ओपनिंग बॅट्समन!

क्रिकेटर: अल्ला मेहरबान तो गधा पैलवान!

प्रा.भोळे: पण माझ्या व्यक्तिरेखेस न्याय..

गोडमगुंजे: अन्याय! प्रत्यक्ष नेत्यावर अन्याय तर जनतेचे काय?

कुलकर्णी: मी माझ्याच भूमिकेचा उतरवतो विमा! भूमिका पडली तरी मान वर!

रब्बरसिंग: खरा दरोडा घातला असता ना..

नाटकातील लेखक: अति शहाणे आहेत हे खरे लेखक. पाहुण्याच्या काठीने साप मारावा तशी सारी पात्रे मी हलवतोय असे दाखवताहेत! आणि बिनधास्त कोणाची शेपटी कोणाला लावायची ते ठरवताहेत..

खरा लेखक: नाही. विचार करूनच हे केलेय बा लेखका. तुला या पंचतारांकित हॉटेलात बसवण्याचा निर्णय माझा. गोडमगुंज्यांची पॅराशूटने डॅशिंग एंट्री.. मी ठरवली. अगदी ह्या कुत्र्याच्या पिलास सामावून घेतले.. त्याची मात्र काही तक्रार नाही.

क्रिकेटर: कोण कुत्रा? ही इज अवर फॅमिली मेंबर. हो की नाही शूरसेना?

(शूरसेन भो भो करत शेपूट हलवतो.)

गोडमगुंजे: तर आज या ठिकाणी नाटकाचा शुभारंभ झाला असे मी जाहीरपणे जाहीर करतो..

प्रा.भोळे: यस. लॉजिकली लॉजिकल! नाटकीय अगदी!

कुलकर्णी: तर, क्षणभर समजूया की इथवर सारे काही ठीक आहे, पण पुढे काय? आम्ही पार पुढपर्यंत, म्हणजे जिंदगी के बाद भी विचार करणारी जमात!

प्रा. भोळे: दॅटस अ लॉजिकल प्रश्न!

साळुंखे: काहीतरी विचार असणारच ना! त्याशिवाय का इथवर आलीय गोष्ट? गोडमगुंजे साहेब, तुम्ही व्हा पुढे!

गोडमगुंजे: या ठिकाणी आम्ही सर्व समाजातील छोट्यात छोट्या..

क्रिकेटर: बट डॅड, व्हॉट नेक्स्ट?

प्रा.भोळे: सन, द रायटर विल टेल अस.. वेट अ बिट!

क्रिकेटर: टू डॅड! व्हेरी टू!

प्रा.भोळे: बट सन, अंतिम सत्य असं जगात काहीच नसतं बरं. सत्य इज एव्हर इव्हॉल्व्हिंग!

क्रिकेटर: दॅटस् ओके डॅड. आपण आता पोस्ट टूथ जमान्यात आहोत.. सो, मि.लेखक! टेक धिस इन कन्सिडरेशन!

खरा लेखक: होय.. विचार सुरू आहे!

विदूषक: विचार सुरू.. रस्ता बंद?

खरा लेखक: विचार सुरू आहे. कथानकात पुढे काय घडेल वा घडवावे याचा!

विदूषक: मग इतका वेळ काय करत होतात?

क्रिकेटर: इट्स लाइक वेस्टिंग टाइम ॲट द क्रिझ.. जस्ट टेकिंग द गार्ड!

प्रा.भोळे: लॉजिकल माय सन!

कुलकर्णी: मी सांगतो..

साळुंखे: ए विम बार, गोडमगुंजे साहेबांना बोलू दे..

गोडमगुंजे: या ठिकाणी..

खरा लेखक: माझे ऐका..

(सगळे एकत्र बोलायला लागतात. गोंधळ माजतो. फास्ट फॉर्वर्ड बडबड ऐकू येते. त्याबरोबर पात्रांचे हातवारे ही. थोडा वेळ असाच जातो.
पाठून वीज कडाडल्याचा आवाज. क्षणभर अंधार. उजेड होता होता स्टेजवर कवी बबु. कृष्णासारख्या वेशात. सारे अचंबित होऊन बघत राहतात..)

खरा लेखक: कवी बभ्रुवाहन? तुम्ही परत?

कवी: यदा यदा ही कर्मस्य.. दिसते कुणी अडचणीत.. तेव्हा माझ्या अंतर्चक्षुंत दिसते ते. मग तिथे मी धाव घेतो..

खरा लेखक: पण तू .. तुम्ही कोण? साक्षात भगवान कृष्ण?

कवी: तसे समजा हवे तर!

खरा लेखक: आणि सांगतोस काय? गीता? मगाशी आलेलास तेव्हा म्हणालेलास, उचल लेखणी लिहून टाक.. सुचेल तसे, घे शाई, बुडव टाक!

कवी: अर्थातच. गोष्टी सांगेन युक्तीच्या चार! भर रणांगणात सांगितले तेच! आपापले काम करत रहा! ताण कल्पनाशक्तीचा रबरबँड नि वाजू दे तुमच्या नाटकाचा बँड! जीवनाच्या समरांगणात होऊन जाऊ देत लढाई. अशी ज्याची मग माराल आयुष्यभर बढाई! द्या विपरीत परिस्थितीशी लढा.. मग व्हाल न व्हाल यशस्वी.. का उगाच कुढा! खरंय की नाही?

खरा लेखक: खरंय.. पण..

नाटकातला लेखक: माझा पण एक प्रश्न होता.. भर युद्धात गीता सांगितलीत. ते ठीक. आजवर आपल्याकडे सगळे विद्वान अजूनही गीता ज्ञान सार काढताहेत. कुणी काही, कुणी काही अर्थ लावताहेत.

विदूषक: नि जेव्हा भर युद्धात सांगितली गीता तेव्हा अर्जुन एका झटक्यात ती समजून उमजून लगेच कामाला ही लागला?

कवी: अरे, अर्जुनच म्हणाला कृष्णाला, गीता सांगून टाक.. काय तो उपदेश एकदाच करून टाक! मला कळेल न कळेल ह्याची चिंता नकोस करू.. समजेल तितके समजेल, नाहीतर जाऊ दे मरू!

कुलकर्णी: मरू द्या? पण विमा उतरवूनच बरे!

कवी: मग काय! श्रीकृष्ण उपदेश करत जाय!

नाटकातला लेखक: काय सांगता काय?

कवी: अर्थात! खोटे सांगतो काय?

खरा लेखक: पण तुम्ही असे अचानक..

कवी: टपकता कसे हेच ना?

खरा लेखक: नाही, अवतरता कसे..?

कवी: अर्थ एकच! आधी थोडा साध्या कवीसारखा होतो तेव्हा टपकतो म्हणावे .. आता थोडा कृष्णासारखा आहे तर अवतरतो म्हणा! अर्थ एकच!

खरा लेखक: नाही पण तुम्ही.. इथे असे अचानक कसे?

कवी: कसे म्हणजे? अरे, मी तुमच्याहून वेगळा आहेच कुठे? मी तुमच्यातच आहे. अगदी विपरीत परिस्थितीत मन लावून विचार करता तेव्हा मी येतोच. फक्त मन लावून सर्व पणास लावून विचार केला तरच तुमच्यातला मी बाहेर येतो. मग उरले काय? तेच ते गीता ज्ञान! आता तुम्ही सर्व पात्रांची व्यवस्था लावाल. तुम्हाला स्वत:लाच ते करायचे आहे. नाटक काय नि पात्रं काय.. सारे तुमचे तुम्हालाच घडवायचे, घडवून आणायचे आहे! हीच नाटकाची गोष्ट.. गोष्टीचे लेखक.. कर्ता करविता तुम्हीच. लिहिता लिहविता हात ही तुमचाच. शेवटी मनुष्यच करवतो सारे. बरे नि वाईट. त्याच्या त्याच्या बुद्धीनुसार.. हलवत राहातो कठपुतळीसारखी पात्रे.. लिहून काढतो एक जीवनाचे नाटक. कधी लिहितो ती सुखांतिका.. कधी दु:खांत! जैसा ज्याचा वकूब.. नि जैसी ज्याची करणी नि विचारसरणी. नाटकाचे अंक लिहितो तो जन्माबरोबर मिळालेल्या पात्रांबरोबर! अडतो कोठे, अडकतो कोठे, पण शेवटी ते नाटकाचे अंक लिहून काढावेच लागतात ज्याचे त्याला.. मी निमित्तमात्र. नाटकातील पात्रं माणूस ठरवत नाही, पण त्यांना घेऊन

नाटकाचे अंक तो लिहू शकतो.. नव्हे त्याला लिहावेच लागतात! पडदा पडेतोवर! मिळालेल्या पात्रांबरोबरच! मग कधी अडला, अडकला तर माझी आठवण काढतो तो.. मी तर असतोच.. बोलावलेत मनापासून तर येतोच नजरेसमोर! आता ही तुम्हाला तेच करायचेय! बसा लिहायला.. तेच ते खरेखुरे नाटक नि तीच ती नाटकाची खरीखुरी गोष्ट.. हे एक सत्य! निखळ सत्य! पडदा पडेतोवर नाटकाचे अंक लिहिणे कुणास नाही चुकले? मी फक्त निमित्तमात्र.. सांगत गोष्टी युक्तीच्या चार!

प्रा.भोळे: तार्किक अगदी!

क्रिकेटर: आर यु शुअर डॅड?

कुत्रा भो भो करत भुंकतो.

साळुंखे: गोडमगुंजे साहेब, तुम्ही व्हा पुढे..

गोडमगुंजे: आज या ठिकाणी..

खरा लेखक(सर्वांकडे दुर्लक्ष करत) ): असे म्हणता कवी बबु.. की साक्षात कृष्णभगवान?


(क्षणभर अंधार. कृष्ण रूपातील कवी अदृश्य होतो. सारी पात्रे एका जागी थिजल्यासारखी बसलेली आहेत. खरा लेखक दूरवर तो कवी कुठे दिसतोय का ते पाहतो आहे.. मग हळूहळू चालत जवळच्या टेबल खुर्चीवर बसतो. टेबलावरचा टेबललँप लावतो. विचार करत नाटक लिहायला बसतो. सारी पात्रे एखाद्या पुतळ्यासारखी स्तब्ध बसलेली असतानाच पडदा पडतो.)






## डॉ. नितीन मोरे यांची ४८+२ प्रकाशित पुस्तके


यांच्या कव्हरवर क्लिक करताच (नेट असल्यास) पुस्तक उघडेल.


























चक्रमादित्य भाग १ ते ५

यांच्या कव्हरवर क्लिक करताच (नेट असल्यास) पुस्तक उघडेल.








डॉ. नितीन मोरे
मुघले ते शोले
Version 2.0.2.0





HOSTEL-I


डॉ. नितीन मोरे
व्यक्ती आणि कथा २


डॉ. नितीन मोरे




डॉ. नितीन मोरे
व्यक्ती आणि कथा ३




डॉ. नितीन मोरे
प्रीतीची
'प्रेम'
कथा


डॉ. नितीन मोरे










डॉ. नितीन मोरे
सदू
आणि
दादू



डॉ. नितीन मोरे
वाळूतील रेघा


डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे


आधुनिक कहाण्या


डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे
सांगतो ऐका


डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
मी मेल्यानिया बोलते
कानगोष्टी



डॉ. नितीन मोरे
मी मेल्यानिया बोलते


अंजतईय
डॉ. नितीन मोरे
मी मेल्यानिया बोलते



डॉ. नितीन मोरे
'इका'गाईच्या कविता


डॉ. नितीन मोरे
रोमिओची परी कथा


डॉ. नितीन मोरे
ऐसी अक्षरे


Jackson!


सुलट
उलट
डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
ऑर्वेलच्या फार्मात!

# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे सोळावे वर्ष

# डॉ. नितीन मोरे यांचे हे एकोणपन्नासावे पुस्तक.

या पुस्तकाबरोबरच डॉ. नितीन मोरे यांनी पुस्ताअंचे अर्धशतक पूर्ण केले आहे. याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन. डॉ. नितीन मोरे एक यशस्वी श्वसनरोगतज्ञ आहेत आणि एक उत्साही लेखकही. त्यांच्या लेखनात एक टवटवी असते. ते बालसाहित्यही लिहितात आणि तरुणांसाठीही. गंभीरही लिहितात आणि विनोदीही. त्यांचा विनोद कोणाच्या व्यंगावर आधारित नसतो, स्तर सोडत नाही. समाजातील अनिष्ट विसंगतीवर ते आपल्या विनोदातून नेमकं बोट ठेवतात. समझदार वाचकांना त्यांचा इशारा काफ़ी असतो. त्यामुळे त्यांच्या नर्म विनोदाचा एक फ़ॅनवर्ग निर्माण झाला आहे. ते फ़क्त विनोदी साहित्य नव्हे तर निरनिराळ्या प्रकारचे लेखन लिहीतात. त्यांनी गेली अनेक वर्षे आपले लेखन निरंतर चालू ठेवले आहे. त्यांना प्रकाशक मिळायला तोटा नाही. पण त्यांना आपली पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेणारे आणि प्रकाशनप्रक्रिया सुलभ असणारे प्रकाशन हवे होते. त्यांनी ई साहित्यची निवड केली.

डॉ. नितीन मोरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्य-च्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ.

मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१५), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (४९), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१०), डॉ. वृषाली जोशी(४८), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(३३), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१३), श्याम कुलकर्णी(१८), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (७), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन(४) श्रीरंग कौलगी, यशवंत कदम(६), पांडुरंग सूर्यवंशी(३) सुधीर कारखानीस, मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक (३) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य

प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं "ई"यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।

esahity@gmail.com

www.esahity.com

9869674820 (for free books on whatsapp)